

विद्यावार्ता

Peer Reviewed International Refereed Research Journal

One Day Online International Interdisciplinary Conference on

# MULTICULTRUALISM IN THE CONTEMPORARY LITERATURE

Guest Editor
Dr. R. S. Salunkhe, Principal
Dr. P. M. Patil, IQAC, Coordinator

MAH MUL/03051/2012 | Vidyawarta® | April To June 2022 | 010
ISSN: 2319 9318 | Peer-Reviewed International Journal | Special Issue

69) किसान जीवन का यथार्थ : फाँस
प्रा. डॉ. प्रकाश मधुकर आठवले, प्रा. डॉ. सचिन राजाराम जाधव, इस्लामपुर ||254

70) १९८० के बाद के हिंदी साहित्य में नारी विमर्श ('कठगुलाब' उपन्यास के संदर्भ ...
थोरात धर्मेंद्र पंडित, जि. सांगली ||256

71) डॉ. राजेंद्र मोहन भटनागर के दृष्टिकोण से "डॉ. अम्बेडकर : जीवनी और दर्शन"
सु. श्री. रुपाली संभाजी पाटिल, कोल्हापूर ||259

72) दलित विमर्श का पुख्ता स्वर : 'नीला आकाश'
प्रा. शैलजा टिळे, इस्लामपुर ||262

73) अश्विनीकुमार दुबे की कहानी में सामाजिक समस्याओं का चित्रण
श्री. संपत विलास कावळे, कोल्हापुर ||266

74) हिंदी साहित्य में किसान विमर्श
सौ.सना आसीफ डंगरे, कराड ||268

75) Historiography of Multicultural Mutations in Jeanette Winterson's Sexing ...
**Dr. Shubhangi Sadashiv Lendave, Kolhapur** ||271

76) Transnationalism in Salman Rushdie's novel Shalimar the Clown (2005)
**Dr. Vidya Sadashiv Lendave, Solapur** ||277

77) Identity and Consumerist Culture in Don DeLillo's White Noise
**Dr.Ujwala Vijay Patil, Ramanandnagar (Burli)** ||283

78) समकालीन हिंदी साहित्य में बहुसांस्कृतिकता (हिंदी साहित्य में प्रकृति चित्रण के ...
प्रोफेसर डॉ. प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर, जिला– कोल्हापुर (महाराष्ट्र) ||285

79) संजीव के 'धार' उपन्यास में चित्रित आदिवासी की समस्याएँ
प्रा.डॉ.जे.ए.पाटील, जिल्हा–सांगली(महाराष्ट्र) ||291

80) ताराबाई शिंदे यांच्या साहित्यातील स्त्री –पुरुष समानतेचा आढावा
प्रा. सौ. एन. एस. पाटील, पलूस ||294

81) साहित्य आणि संस्कृती अनुबंध
प्रा.विपिन नारायण वैराट, जि.सातारा ||297

82) Perspective on Gandhian Ideology in Bhabani Bhattacharya's "So Many ...
**Rizwana Khatoon, Jashpurnagar, C.G.** ||301

सामाजिक दस्तऐवज आहे. स्त्रियांच्या अहवेलनेची इतकी प्रभावी व आव्हानात्मक मांडणी मराठी वांड्.मयातक्वचितच आढळते. समस्त स्त्री जातीचे दुःख दूर व्हावे आणि स्त्रियांना समाजात सन्मानाचे, प्रतिष्ठेचे व पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त व्हावे. या दृष्टीकोनातून ताराबाईंनी आपले लेखन केलेले आहे. एवढे आधुनिक व क्रांतीकारक विचार इतक्या तर्कशुद्ध पद्धतीने एका स्त्रीने मांडलेले आहेत व तेही समाजाच्या प्रवाहाच्या विरोधात जाऊन. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख आणि महात्मा जोतीराव फुले या स्त्रीवादी विचारवंतांनी यापूर्वी असे प्रयत्न केलेले असले तरी एका स्त्रीने हे धैर्य दाखविण्याचा हा पहिलाच प्रसंग या पुस्तकाच्या निमित्ताने निर्माण झालेला दिसतो.

संदर्भ

विलास खोले – स्त्री–पुरुष तुलना, यथामूल संशोधित आवृत्ती, प्रतिमा प्रकाशन,पुणे.

❑❑❑

81

# साहित्य आणि संस्कृती अनुबंध

प्रा.विपिन नारायण वैराट
शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
वाघोली ता.कोरेगाव जि.सातारा

**प्रस्तावना :** साहित्य आणि संस्कृती या दोन्ही संकल्पना आज समाजात खूप व्यापक अर्थाने स्थिर झालेल्या आहेत. ह्या दोन्ही संकल्पना मानव केंद्रीत आहेत. दोन्ही संकल्पनांची निर्मिती समाजात होत असल्याने त्यांचा त्यांच्यात अनन्यसाधारण संबंध आहेत. साहित्य जशी मानवाची निर्मिती आहे, त्याच प्रमाणे संस्कृती देखील मानवाची निर्मिती आहे. सहाजिकच दोन्ही गोष्टी एकमेकांना प्रभावित करीत असतात. साहित्यात समाजाचे आणि तो आचरण करीत असलेल्या संस्कृतीचे प्रतिबिंब कळत–नकळत पडत असते. तर प्रत्येक संस्कृती त्या, त्या समाजाचा अविभाज्य हिस्सा असल्याने तिचे संवर्धन समाज माणसाकडून होत असते. संस्कृतीच्या माध्यमातून समाजावर ही संस्कार होत असतात. त्या समाजाच्या वर्तनाचे नियमन, विकसन घडत असते. ह्या गोष्टी साहित्यनिर्मितीवर आपला प्रभाव टाकतात. कारण साहित्य निर्मिती करणारा साहित्यिक हा समाजाचे अपत्य असतो. साहित्य आणि संस्कृतीचा अनुबंध अभ्यासत असताना या संकल्पना समजावून घेणे अपरिहार्य ठरते. त्यासाठी साहित्य आणि संस्कृती या दोन्ही संकल्पना स्वतंत्ररीत्या अभ्यासणे गरजेचे ठरते. त्यातून त्यांचे परस्पर अनुबंध स्पष्ट होत जातील.

आजच्या काळात साहित्य हा शब्द अनेक अर्थाने वापरला जातो. साहित्य हा शब्द सहित पासून बनला आहे. सहित म्हणजे एकत्र असणे. शब्द आणि अर्थ यांचे एकत्र असणे असा साहित्य शब्दाचा मतितार्थ होतो. म्हणजे शब्द आणि अर्थ ज्यात एकत्र आहे

त्याला साहित्य म्हणू शकतो. पण सर्वच प्रकारच्या साहित्यात शब्द आणि अर्थ एकत्रित असतात. त्यात इतिहास, भूगोल, रसायनशास्त्र, वाणिज्य या सर्वांचा समावेश होतो. मात्र साहित्य हा शब्द ज्या अर्थाने आपण वापरणार आहोत त्यात शास्त्र मोडत नाहीत. साहित्यविषयक विचार करीत असता साहित्य हे समूह निर्मित जसे असते तसेच ते व्यक्ती निर्मितीतही असते. समूह निर्मित साहित्याला लोकसाहित्य म्हटले जाते, तर दुसऱ्या प्रकारच्या व्यक्ती निर्मित साहित्याला ललित साहित्य म्हटले जाते. एखाद्या व्यक्तीने प्रतिभा शक्तीच्या सहाय्याने केलेले लेखन या लेखनातून वाचकाला आणि लेखकाला आनंद मिळतो तेच साहित्य होय. प्राचीन काळी संस्कृत काव्यशास्त्रज्ञांनी साहित्याच्या अनेक व्याख्या केल्या आहेत. त्यातून स्वरूप आणि साहित्याची व्याप्ती स्पष्ट होते.

साहित्य संकल्पना पाहिल्यानंतर संस्कृती संकल्पना अभ्यासू. मुळात संस्कृती ही संकल्पना खूपच व्यापक आहे. तितकीच ती गुंतागुंतीची देखील आहे. कल्चर या इंग्रजी भाषेतील संकल्पनेला मराठीतील पर्यायी शब्द संस्कार आपण वापरत आलो आहोत. संस्कार आणि संस्कृती हे दोन्ही शब्द सम आणि कृ या एकाच धातुपासुन बनलेले आहेत. संस्कृती शब्द इंग्रजीतील Culture आणि Civilization यांचा पर्यायी शब्द म्हणून आहे. Culture हा शब्द Colere (to Cultivate or Instruct) या लॅटिन धातुपासून तयार झाला आहे. Colere म्हणजे संस्करण अथवा अभ्यासन. (Cultivation or training) व्यापक अर्थाने संस्कृती म्हणजे अभ्यासीत किंवा संस्कारित असा होतो. संस्कृती शब्दाचा अर्थ असा होतो की सम् म्हणजे चांगले आणि कृती म्हणजे चांगले आचार, विचार म्हणजेच संस्कार होय. आता संस्कृतीच्या विचारवंतांनी केलेल्या काही व्याख्या पाहू या.

**१) रॉबर्ट बियर स्टेड** : आपण ज्या रीतीने विचार विविध गोष्टी करतो आणि समाजाचे सभासद या नात्याने आपल्या जवळ जे काही असते. अशा सर्व बाबींची संकीर्ण समग्रता म्हणजे संस्कृती होय. (Culture is the complex whole that consists of all the ways we think and do and every thing we have as a member of society).

**२) सर एडवर्ड डी टायलर** : संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की,ज्यात ज्ञान श्रद्धा कला नीती कायदा रूढी या व अशाच इतर घटकांना व सवयींना समावेश होतो. आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात. (Culture is that complex whole which includes knowledge, beliefs, art, morals, customs and any other capabilities and habits acquired by man as a member of society.)

**३) सोरोकिन** : दोन किंवा अधिक व्यक्तींच्या अंतरक्रियेतून किंवा परस्परांच्या वर्तनविषयक प्रभावातून जाणतेपणी किंवा अजाणतेपणी ज्या गोष्टींची निर्मिती होत असते .अशा प्रत्येक गोष्टीच्या एकत्रित करणाला संस्कृती असे म्हणता येते. (Culture is defined as the sum total of every thing Which is created or moditied by the conscious or unconscious activity of two or more individuals which one another or conditioning one anothers behaviour.)१

प्रस्तुत सर्व विचारवंतांच्या व्याख्यांच्या आधारे हे स्पष्ट होते की, संस्कृती संकल्पना बहुआयामी आणि गुंतागुंतीची आहे. तिची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे शक्य नाही. अभ्यासक द. ता. भोसले यांनी केलेल्या व्याख्येवरून संस्कृती विषयक कल्पना अधिक स्पष्ट होते. ते लिहितात, संस्कृती या शब्दाला अतिशय तरल व गुंतागुंतीच्या अर्थछटा असल्या तरी प्रकृती आणि विकृती हे दोन शब्द जोडीने नेल्यास संस्कृतीचा अर्थ समजण्यास थोडीशी मदत होते. प्रकृती म्हणजे निसर्ग विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार म्हणजे बदल या उद्देशाने प्रकृतीवर केलेला संस्कार म्हणजे संस्कृती होय. उदा— दुध हे प्रकृती, जंतूमुळे ते नासणे ही झाली विकृती, तर ते नासु नये म्हणून ते आटवणने व त्यात साखर केशर वेलदोडे घालून त्याचा पेढा बनवणे म्हणजेच संस्कृती.२ प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे प्रकृतीत बिघाड होणे, अथवा प्रकृतीला विकार जडणे आणि प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून प्रकृतीवर करावयाचा संस्कार म्हणजे संस्कृती होय. एकूणच साहित्य आणि संस्कृती

संकल्पनाचा अनुबंध समाजाशी जोडलेला आहे. समाजजीवन मानवी जीवनाधीष्ठीतअसते. मानवी जीवन हा साहित्याचा मुख्य विषय असतो, त्याप्रमाणे संस्कृती आकाराला येते ती मानवासाठी. त्याच्या जीवनाला आकार देण्यासाठीच. त्यामुळे साहित्य आणि संस्कृती घनिष्ठ संबंध असतात. समाजामधील सांस्कृतिक परिवर्तनाचा परिणाम साहित्यावर होत असतो. साहित्याचा प्रारंभिक अविष्कार ज्या काव्यातून झाला ते वेद, पुराणे, महाभारत, रामायण हे ग्रंथ दीर्घ आणि जीवन मूल्य संस्कार देणारी होती. मानवी जीवन संत शुद्ध सात्विक होते. जीवनात भ्रष्टपणा, गढूळपणा फार नव्हता. अशा शांत, प्रेरणादायी वातावरणात महाकाव्यांची निर्मिती झाली.अभिजात साहित्य म्हणून ते आजही ओळखले जाते. शाश्वत मूल्यांना परिपोष या साहित्यातून झालेला दिसतो. महानुभाव संप्रदायातील साहित्यात समाजप्रबोधन केलेले दिसते. वर्णव्यवस्था, स्त्री—पुरुष भेद, उच्च—नीचता, अध्यात्मविषयक अज्ञान यांसारख्या विषयांवर भाष्य केलेले दिसते. खरा धर्म, खरे अध्यात्म मांडण्याचा प्रयत्न महानुभाव संप्रदायातील साहित्यातून झालेला दिसतो. समाजाची गरज ओळखून प्राकृत भाषेत ग्रंथ निर्मिती करण्यावर त्याकाळी भर देण्यात आला होता. हे करीत असताना तत्कालीन लोक जीवनातील संदर्भ दाखले देऊन अपेक्षित विचारांचे प्रबोधन करण्यात आले. त्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला.त्यातून तत्कालीन सामाजिक जीवनाचे व संस्कृतीचे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. पुढे वारकरी संप्रदायातील साहित्याने भक्तीमार्गाची ओळख करून दिली. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव इत्यादी संत मंडळींनी समाजाला शाश्वत सुखाचा भक्ती मार्ग दाखवला. विठ्ठलसवाद मांडला. प्राणीमात्रांवर प्रेम करायला शिकवले. कर्मकांड जिथे वाढले होते, तिथे नाम महात्म्य आणि साधीभोळी पण निस्सीम भक्ती चे महत्व विशद केले. समाजजीवनातील भ्रष्ट आचरणाला आळा घालण्याचे महत्त्वाचे कार्य संत साहित्याने केले. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना संघर्ष बरोबर उपेक्षा या दोन प्रेरणांनी दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्य आकाराला आलेले दिसते. प्रस्तुत तिन्ही साहित्य प्रवाहांच्या प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये यांचे चिंतन केले असता सांस्कृतिक पार्श्वभूमी चे आकलन करणे महत्त्वाचे ठरते. या साहित्य प्रवाहांचा निर्मितीची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेतल्याशिवाय अशा साहित्याचे आकलन अशक्य आहेत. ते झाले तरी अपूर्ण असते.

शब्दरूप भाषेतून साहित्य आकाराला येते. साहित्याची भाषा ही सांस्कृतिक घटकांची संग्राहक आणि वाहक असते. साहित्याच्या भाषेमध्ये बहुसंख्य अर्थ सांस्कृतिक घटकांचे असतात. एकाच वस्तूचा बोध करून देणाऱ्या दोन वेगवेगळ्या भाषेतील शब्दांचे सांस्कृतिक अर्थ भिन्न स्वरूपाचे असू शकतात. तर भाषेतील शब्द एखाद्या भाषेत रुजतो त्यावेळी त्या शब्दाला तेथील सांस्कृतिक घटकांचे आवरण असते. त्यातून अभिप्रेत भावनांचे प्रकटीकरण होते. अशा शब्दांना प्राप्त झालेल्या सांस्कृतिक अर्थामुळे समाजामध्ये आपल्या सांस्कृतिक संदेशाचे आदान—प्रदान सहज पातळीवर शक्य होते. साहित्यिक आपल्या अवती—भवतीच्या प्रचलित लोक भाषेशी आपल्या लेखणीच्या भाषेचा अनुबंध लागतो. प्रादेशिक संस्कृतीतील प्रसंगानुसार येणाऱ्या म्हणी, वाक्यप्रचार, त्याचबरोबर लोकोक्ति वापर आपल्या साहित्यात करतो. त्या, त्या प्रतिकांचा, प्रतिमांचा वापर करून साहित्याचे सौंदर्य खुलवत असतो. एखाद्या प्रसंगाचे व्यक्तीचे निसर्गाचे चित्रण अशा कारणाने सु चित्र होते. त्यात जिवंतपणा येतो. त्याला उठावदारपणा येतो. काही वेळा पुराणातील, इतिहासातील दाखले संस्कृतीच्या अनुषंगाने लेखक देत असतो भारतीय साहित्यातल्या मिथकांच्या महत्त्वाचे स्थाना विषयी दुमत असण्याचे कारण नाही. रामायण, महाभारतासारख्या महाकाव्य, अनेक पुराण कथा, प्राचीन संस्कृत साहित्य, बौद्ध साहित्य, जैन साहित्य या सर्वांमध्ये असलेले मिथकांचे प्राबल्य स्पष्टच आहे. देशोदेशीच्या असल्या मिथकांमध्ये काही एक साम्य आढळते. विज्ञानाच्या विकासामुळे मिथकांचे महत्त्व कमी होईल असे वाटत होते, पण प्रत्यक्षात उलटेच झाले. गेल्या पन्नास वर्षात जगातल्या बहुतेक सर्व भाषांमधल्या सर्वोत्तम कृतींवर मिथकांचा प्रभाव स्पष्ट दिसतो.३ हे डॉ मु. व. शहा यांचे त्याबाबतचे विचार

यथार्थ वाटतात.

प्रत्येक समाजाची एक संस्कृती असते. जगण्याची रीत असते. त्याचबरोबर काही धारणा, श्रद्धा, असतात. त्यानुसार त्या समाजातील व्यक्तींची, लेखकाची जडणघडण होत असते. साहित्यीक ज्यावेळी साहित्य निर्मिती करण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी आपल्या प्रतिभेच्या साह्याने आलेल्या अनुभवांचा, त्याचबरोबर भावनांचा एक पट उलगडून दाखवत असतो. कोणत्याही साहित्याच्या निर्मात्याला लोकाभिमुख राहून समाजातील विविध धारणांशी आपल्या निर्मितीचा अनुबंध राखावा लागतो. कारण त्याचीही जडणघडण या समाजानेच केलेली असते. त्याच्या अनुभवाचा अविष्कार होत असताना या धारणा दिसून येतात. लोकजीवनातील तत्त्वे दिसून येतात. आधुनिक साहित्यामध्ये भौतिक पर्यावरण बदलले असेल, पण लोकसाहित्याने बीज अजूनही आपले मूळ घट्ट धरून आहे असे दिसते. परंपरागत संस्कारमूल्य, रूढी, विचार, धारणा यांना आधुनिक साहित्याने तिलांजली दिलेली नाही.४ हे डॉ. नीला जोशींचे त्याबाबतचे विचार साहित्यिकांची संस्कृतीशी असलेली एकरूपता सिद्ध करते. संस्कृती मधील यात्रा–जत्रा, सण–उत्सव यांची वर्णने साहित्य येतात. विवाहविधी, नवस बोलणे, विविध प्रथा, परंपरा जसे की, जागरण, सुहासिनीची ओटी भरणे, अशा लोक परंपरेचे दर्शन साहित्यातून घडते. दृष्ट लागणे, कोप होणे, या लोक समजुती साहित्यात आढळतात. या साऱ्या साऱ्यांतून साहित्यात संस्कृतीचे दर्शन घडते. लोककला, म्हणी, वाक्यप्रचार यांचा मुबलक वापर यांतून लोकसंस्कृतीचे दर्शन साहित्यात होते. जल, पशु, सर्प, वृक्ष, सुर्य, चंद्र यांची देव देवता रूपाने होणारी उपासना, साती आसरा, मरिआई, यमाआई, काळुबाई, मसोबा, वेताळ, भैरव, यल्लम्मा, जानुबाई यांसारख्या अनेक ग्राम देव दैवता यांची वर्णने, गावावर अथवा स्वतःवर अनिष्टे येऊ नये म्हणून केले जाणारे विधी, निष्ठापूर्वक जोपासल्या जाणाऱ्या श्रद्धा या साऱ्यांचे प्रतिबिंब साहित्यात पडताना दिसते. या संदर्भात प्रभाकर मांडे लिहितात, समाजातील व्यक्तींना स्वतःचे निराळेपण किंवा व्यक्तिमत्व प्राप्त झाले तरी, आदिम समाजाची काही लक्षणे याही समाजात दिसतात. म्हणजेच व्यक्तिगत अनुभव आणि समूह मनाने घेतलेले अनुभव या दोघांचेही अस्तित्व त्याच्या अनुभवात असते. म्हणूनच त्याच्या अनुभवाच्या आविष्कारात व्यक्ती निर्मित असाधारणत्व जसे असते, तसेच पारंपारिक लोकसमूहाच्या मनाचा अविष्कार ही असतो. व्यक्तीनिर्मित साहित्यात किंवा कलाकृतीत अपरिहार्यपणे येणाऱ्या या लोकसमूहाच्या माणसाच्या अविष्कारास लोकसाहित्य तत्व किंवा लोक तत्व असे म्हणतात.५ या साहित्यात येणाऱ्या लोकतत्त्वाच्या रुपाने साहित्य आणि संस्कृतीचा अनुबंध आणखी घट्ट होताना दिसतो. व्यक्तिचित्र असो, वातावरण निर्मिती असो, अथवा आशय असो संस्कृतीच्या प्रस्तुत घटकांचा प्रभाव साहित्यावर जाणवल्याशिवाय राहत नाही.

समाजात अस्तित्वात असलेली सांस्कृतिक व्यवस्था, त्यामध्ये संस्कृतीची मूल्य, श्रद्धा, नियमने, यांच्या विषयक साहित्यिकाला त्याच पर्यावरणातून आल्याने आस्था असते. ज्या समाजाचा आपण एक भाग आहोत घटक आहोत त्या समाजामध्ये व्यक्तीमध्ये निर्माण होणारे काही दोष याविषयीही काही भाष्य साहित्यिकाला करू वाटते. प्रस्तुत समाजाला सुखी करण्यासाठी, अपेक्षित संस्कार देण्याकरिता, त्याचे जीवनमान उंचावून सहज, सुलभ, आनंदी होण्यासाठी कशा प्रकारचे साहित्य आवश्यक आहे. या जाणिवेतून साहित्यिक साहित्य निर्मिती करतो. कोणत्या प्रसंगात काय केले पाहिजे, व्यक्तीपरत्वे आपले वर्तन कसे असावे, यांसारख्या वर्तन अभ्यासाचे मार्गदर्शन साहित्य विविध पद्धतीने करते. लोककथां प्रमाणेच समस्त समाजाला ज्ञानी करण्याच्या उद्देशाने संस्कृतीत फार प्राचीन काळापासून बोधकथा यांची निर्मिती झालेली दिसते. साहित्यात रूढ झालेले विनोदी चुटके, वेगवेगळ्या म्हणी, वाक्यप्रचार, उखाणे, सुभाषिते या साऱ्या साऱ्यांतून समाजाचे प्रबोधन करणे हाच हेतु असलेला दिसतो.

**समारोप** : अशाप्रकारे समाजातील व्यक्ती अथवा मानवा साठीच साहित्य अथवा संस्कृती आकाराला येताना दिसते. साहित्य आणि संस्कृती या दोन्ही संकल्पना एकमेकांना पूरक असलेल्या जाणवतात. संस्कृतीचा अभ्यास केल्याशिवाय साहित्याच परिपूर्ण ज्ञान होऊ शकत नाही आणि साहित्यातून संस्कृतीचे

ज्ञान झाल्याशिवाय राहत नाही हे स्पष्टपणे जाणवते. दोन्ही संकल्पना एकमेकांना कायम प्रभावित करीत आलेल्या आहेत. साहित्य आणि संस्कृती यांचे अनुबंध त्यातून अधोरेखित होताना दिसतात.


संदर्भ

१) विजय मारुलकर, दयावती दयावती पाळकर ,समाजशास्त्र परिचय , फडके प्रकाशन, कोल्हापूर , प्रथमावृत्ती, (संस्कृतीच्या सर्व व्याख्या)

२) द. ता. भोसले, संस्कृतीच्या पाऊलखुणा, पदमगंधा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००४ ,पृ. १२

३) मु.बा.शहा, (संपा.), मिथक आणि मराठी साहित्य, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथमावृत्ती ,2003, प्रास्ताविक .

४) गिरीश मोरे (संपा.) परिवर्तनाचा जागर, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील लोकतत्वे, डॉ. नीला जोशी, निर्मिती संवाद, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०१२, पृ. ७१

५) प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद,१९९५ पृ .३३१


❑❑❑

**82**

# Perspective on Gandhian Ideology in Bhabani Bhattacharya's "So Many Hungers"

**Rizwana Khatoon**
Assistant Professor (Department of English), Govt.R.B.R. N E S PG College Jashpurnagar, C.G.

***********

**Abstract:**

Mahatma Gandhi strongly believed in satya (Truth), ahimsa (non-violence), satyagrah (non-violent resistance) and purity of soul. His ideologies have immense effect on the whole world. While his ideologies aromatized the air of pre and post independent India, all spheres of fields danced under his magic spell. Indian English Literature isn't left untouched by his presence in one or the other form. Some writers portrayed him as a character while others portrayed their characters as Gandhiji. The novelists of pre-independent India tried to create literature depicting Gandhian movement of thirties and forties. This is clearly reflected in the works of Raja Rao, Bhabani Bhattacharya K.S.Venkataramani, Mulk Raj Anand, R.K.Narayan and many more.

Bhabani Bhattacharya grew up in an age when the nation was struggling for its independence and human rights. Bhattacharya, in his fiction, assigned the highest place to human values. Being an advocate of Gandhian principles of truth and non-violence, Bhattacharya created a fictional world in which Gandhian principles were put to severe tests. His novel 'So Many Hungers!' was published in October, 1947; two months after India got its long awaited freedom from foreign rule. The novel was set against the backdrop of the Bengal Famine of 1943 and the Quit India Movement of 1942.